**RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC**

# POWER OF KNOWLEDGE

**An International Multilingual Quarterly Refereed Research Journal**

## UGC Approved

**Editor**
**Dr. Sadashiv H. Sarkate**

**• Mailing Address •**

**Dr. Sadashiv H. Sarkate**

**Editor : POWER OF KNOWLEDGE**

**Head of Dept. Marathi**

Art's & Science College, Shivajinagar, Gadhi, Tq. Georai Dist. Beed-431 143 (M.S.)

Cell. No. 9420029115 / 7875827115

Email : powerofknowledge3@gmail.com /

shsarkate@gmail.com

**Price : Rs. 300/-**

**Annual Subscription: Rs. 2000/-**

RNI No.MAHAUL03008/13/1/2012-TC

ISSN 2320-4494

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Refereed Research Journal

**Volume I, Issue II**
***Jan. to Mar.- 2022***

Editorial Officer
**Shraddha Enterprises**
Infront of Tahsil Office,
Near Nilkamal Hotel,
Nagar Road,
Beed -431 122
Contact : 9420655507
E-mail : prakashkale.kale@gmail.com

**Published By :**
Mrs. Lata Sadashiv Sarkate

**Price :** Rs. 300/-

**Advisory :-**

**Hon. Dr. Sudhir Gavhane**
Ex.Vice Chancller Y.C.M.U. Nasik
& Professor of Mass Communication
& Jornalism Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. V. B. Bhise**
Ex-Professor, Dept. of Economics
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Madan Shivaji**
Ex-Management Council Member
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Bhagwat Katare**
Ex. Director, BCUD
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Sanjay Nawale**
Head of Dept. Hindi
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Hon. Dr. Paralikar Kanchan**
Principal, Mahila College, Georai

**Hon. Dr. Ashok Mohekar**
Ex-Magement Council Member
Dean, Faculty of Science,
Dr.B.A.M.U. Aurangabad

**EDITOR**

***Dr.Sadashiv Haribhau Sarkate***
Ex-Chairman-BOS in Marathi, Dr.B.A.M.U.Aurangabad
Asst.Professor & Head, Dept. of Marathi, JBSPM's
Arts & Science College, Shivajinagar, Gadhi Tq. Georai Dist. Beed

**EDITOR BOARD**

**Dr.Shirish Patil**
Ex-Dean, Faculty of Arts
N.M.University Jalgaon

**Dr.Bharat Handibag**
Ex-Dean, Faculty of Arts
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr.Vilas Khandare**
Ex-Dean, Faculty of Social Sciences
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr. Ashok Deshmane**
Head of Dept.Marathi
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Dr.Sudhakar Shendge**
Professor of Hindi
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Dr.D.P. Takale**
Asso.Professor & Head
Dept. of Economics
L.B.S.College, Partur Dist.Jalna

**Dr.Appasaheb Humbe**
Ex-Management Council Member
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr.Ulhas Shinde**
Ex-Dean, Faculty of Engineering
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr.Pratibhatai Patil**
Ex-Management Council Member &
Professor & Head, Dept.of Pub.Adm.
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr. Rajesh Karpe**
Management Council Member
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr. Taher H. Pathan**
Aligad Muslim university, Aligad (U.P.)

**Dr.S.D.Talekar**
Professor, Dept. of Commerce
L.B.S.College, Partnr Dist Jalna

**Dr.S.R.Takale**
Principal, Sant Sawatamali, College,
Phulambri Dist. Aurangabad

**Dr.Bharat Khandare**
Principal, Swami Vivekanand College,
Mantha. Dist. Jalna

**Dr.Vishwas Kadam**
Principal, JBSPM's Arts & Science
College, Gadhi Tq.Georai, Dist. Beed

**Dr. Phulchand Salampure**
Management Council Member
Dr.B.A.M.U.Aurangabad

**REFERECS**

**Dr.Shahaji Gaikwad**
Ex-Chairman, BOS in English
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr.Vishwas Patil**
Radha Nagari College,Radha
Nagari, Dist. Kolhapur

**Dr. Dilip Khairnar**
Professor, Sociology
Deogiri College, Aurangabad

**Dr. Sukumar Bhandare**
Ex-Chairman, BOS in Hindi
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr. Shivaji Yadhav**
Shivchhatrapati College,
Pachod, Dist. Aurangbad

**Dr. Laxmikant Shinde**
Assit.Professor
JES College, Jalna

**MANGING EDITORS**

**Mr. Ramesh Ringne**
**Prof. Bapu Ghokshe**
**Mr. Shivaji Kakade**
**Dr. Shakur Shaikh Husain**

**Mr. Vinod Kirdak**
**Dr. Datta Tangalwad**
**Mr. Kalandar Pathan**
**Dr. Suhas Morale**
**Dr. Baliram Katare**

**Assit.Prof.Mohan Kalkute**
**Dr. Adgaonkar Ganesh**
**Dr. Santosh Chavan**
**Dr. Rajkumar Yallawad**

| | | | |
|---|---|---|---|
| 15 | दलितांची आत्मकथने | प्रा. डॉ. दिलीप कसबे | 62 |
| 16 | Global and Local in Amit Chaudhuri's Strange and Sublime Address | Dr. Laxmikant Bahegavankar | 68 |
| 17 | EMPLOYEE SAFETY MEASURES FOR BETTER WORKING CONDITION | Wilson Kandre | 70 |
| 18 | Agricultural distress: Rising of farmers Problems & Suicide | Dr. Syed Tanvir Badruddin | 73 |
| 19 | मराठी ग्रामीण कादंबरीतील सहकाराची स्थितीगती | प्रा. डॉ. बबन गायकवाड | 76 |
| 20 | Gamma ray interaction studies of some metal oxides in the energy range of 122KeV-1330KeV | Pradip S. Dahinde<br>Dr. Pravina. P. Pawar | 81 |
| 21 | सुर्यबाला की कथा साहित्य में वर्णित महानगरीय समस्याऐं | डॉ. संतोष मोटवानी | 91 |
| 22 | वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील जाणीवा | प्रा. डॉ.धनंजय महादेव होनमान | 94 |
| 23 | जिल्हा नियोजन व विकास प्रक्रियेत जिल्हा नियोजन समितीची भूमिका: बीड जिल्हा एक अभ्यास | अश्विनी भास्करराव बनकर | 97 |
| 24 | महिला सबलीकरणाची सामाजिक अपरिहार्यता | प्रा. डॉ. माधव माणिकराव मोरे | 100 |
| २५ | यशवंतराव चव्हाणांची सीमाप्रश्नाविषयी भूमिका | डॉ.जयराम ढवळे | 104 |
| | | | |
| | | | |

# यशवंतराव चव्हाणांची सीमाप्रश्नाविषयी भूमिका

**डॉ.जयराम ढवळे**
कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर, गढी
ता.गेवराई जि.बीड

राज्य पुर्नरचना मंडलाचा अहवाल सन १९५६ ला सादर झाला. ह्यानुसार महाराष्ट्रातील बेळगाव, कारवार, निपाणीसह ८०० गावे ही भाषिक प्रांतराज्यनुसार कर्नाटकात गेलेली आहेत. ही शहरे गावे महाराष्ट्राला भाषिक तत्वानुसार मिळावीत म्हणुन अद्यापही लढा हा सुरू आहे. तसेच सन १९६९ पासुन महाराष्ट्र एकीकरण समिती लढा देत आहे. यातुन मराठी भाषिकावर कर्नाटक सरकारकडुन हा लढा दडपण्यासाठी प्रयत्न आजही चालविले जात आहेत. तरी सीमावर्ती भागातुन हा लढा मोठ्या प्रखरतेने सुरू आहे.

महाराष्ट्राला तसेच राष्ट्राला मराठी मातीतुन जे प्रभावी कृतत्वशील, खंबीर निर्णय क्षमता असणारे जे लोकनेतृत्व प्राप्त झालेले आहेत त्यात यशवंतराव चव्हाण ह्या नेतृत्वाचा आग्रक्रमाने उल्लेख करणे महत्वपुर्ण ठरते कारण मानवी जीवनाच्या विकासाच्या विवीध अंगाना जाणणारे तसेच राज्य-राष्ट्रीय पातळीवरील हितसंबंधाना प्राधान्यक्रमन देणारे असेच होते. या नेतृत्वाने राज्याराज्यातील तणावाचे सीमा प्रश्न हे लोकशाही मार्गोने सोडविण्यावर भर दिलेला आहे. असाच एक प्रश्न म्हणजेच महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न हा संपुष्टात यावा म्हणुन देखील त्यांनी कार्य केलेले असुन या कार्याचा आढावा घेण्यासाठी त्यांची भूमिका महत्वाची ठरते आणि आजही महाराष्ट्रासाठी दिशादर्शक वाटते.

## मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांची भूमिका

सन १९५६ ला विशाल व्दैभाषिक मुंबई राज्याचे तसेच सन १९६० ला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना मराठी माणसाच्या भावना लक्षात घेवुन सातत्याने महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादातील महाराष्ट्राला आपले मराठी भाषिक मिळावेत म्हणुन प्रयत्न केलेले, त्यांनी जे भाषणे, विचारमंथन, चर्चा निवेदने केली ह्याचा आधार आज महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्न सोडविण्यास होऊ शकतो. याचा संदर्भ हा सह्याद्रीचे वारे या ग्रंथातून घेण्यात आलेला आहे. बेळगाव, कारवार, निपाणीसह मोठा मराठी भाषिक प्रदेश हा राज्य पुर्नरचनेत कर्नाटकात गेला यातुन महाराष्ट्र-कर्नाटकात सीमावाद हा प्रारंभ झाला. महाराष्ट्राला मराठी भाषीकांचा प्रश्न असल्याने सीमावाद हा जिव्हाळ्यास लागला होता. हा सीमावाद महाराष्ट्रातील सामान्यापासुन ते विविध क्षेत्राशी संबंधीत तसेच राजकीय क्षेत्रात देखील महत्वाचा बनला होता.

मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांनी दिनांक १५ एप्रिल सन १९५८ ला महाराष्ट्राच्या विधानसभेत सीमाप्रश्नाी भूमिका स्पष्ट करताना हा प्रश्न सोडविण्यासाठी प्राधान्य देवुन यासाठी निश्चित धोरणे, तत्वे स्पष्ट केली म्हणजेच सलगपणा, सर्वमत, भाषा ही तत्वे मुंबई शासनाच्या वतीने स्पष्ट केली.

सीमाप्रश्न सोडविण्यासाठी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांचा केंद्रावर मोठा विश्वास होता. म्हणुनच ते म्हणतात चर्चा, तडजोडी आणि सामजस्याने केंद्रसरकार ह्या सीमाप्रश्नावर उपाय करू इच्छिते. या दृष्टीकोनातून आंध्र-तामीळनाडूतील सीमावाद जो पाटसकर निवाड्याने सुटला याचा विशेष उल्लेख ते करतात. कर्नाटक शासनाशी सीमाप्रश्नी चर्चा घडुन झाल्यावर मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण स्पष्ट करतात की, सीमावादावर चर्चा ही प्राथमिक स्वरूपात झालेली असुन या चर्चेत वाटाघाटीत कसलाही अडथळा निर्माण होवु नये म्हणुन मोघम, वादग्रस्त वक्तव्य न करण्याबद्दल सूचना करतात म्हणजेच मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचा लोकशाही मार्गावर श्रध्दा व विश्वास होता हे मात्र नक्की.

भाषावार राज्यपुर्नरचनेमुळे कर्नाटकाला मराठी सीमा भागाची प्राप्ती झाल्यामुळे सीमाप्रश्नासंबंधी कर्नाटकची भूमिका ही सीमाप्रश्न सोडविण्यासाठी तात्काळ दिसुन येत नाही. मराठी भाषिकांची वाढती चळवळ, सीमा भागातील लोकांची सलगता याकडे महाराष्ट्राला दुर्लक्ष करणे शक्य नाही. हा प्रश्न सहकार्याने, सकारात्मक प्रयत्नाच्या साह्याने मार्गी लावणे ही नीती महाराष्ट्राची असल्याचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण स्पष्ट करतात.

सीमाप्रश्नाला होत असलेली दिरंगाई हा चिंतेचा विषय बनत चालला होता. विरोधकांकडून सातत्याने सीमाप्रश्नावर होणारी चर्चा यातुन काही निश्चित परिणाम देखील येत नव्हता यावर मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांची प्रतिक्रीया होती की, एखादा प्रश्न सोडविण्याची आवश्यकता ही दोघाची देखील असणे गरजेचे होय मात्र हा प्रश्न कर्नाटककडुन निश्चित प्रतिसादाच्या अभावामुळे सुटणे शक्य वाटत नाही.

कर्नाटकाचे मुख्यमंत्री निजलिंगअप्पा यांच्याशी चर्चा करून देखील काही परिणाम स्पष्ट दिसला नाही. महाराष्ट्र-कर्नाटक राज्याचा सचिवांची चर्चा झाली परंतु या चर्चेतुन काही साध्य झाले नाही असे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण स्पष्ट करतात.

सन १९५८ ला कर्नाटकचे मुख्यमंत्री म्हणुन जतीची निवड झाली तेव्हा मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांनी जतीशी देखील सीमाप्रश्न सोडविण्यासाठी चर्चा केली असता श्री. जतीच्या हावभाव, वर्तुणुकीतुन सीमाप्रश्न हा त्यांच्या दृष्टीने महत्वपुर्ण मुद्दा वाटत नसल्यामुळे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांच्या लक्षात आले.

निपाणी घेवुन हा प्रश्न सोडविणयाचे मुक्यमंत्री जती यांनी स्पष्ट केल्यावर यावर प्रतिक्रिया मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांची अशी होती की, तुमच्या कडे भीक मागत नाही न्यायाने कर्नाटकांचा मराठी भाषिकांचा भाग हा महाराष्ट्रास परत करावा. यावरुन यशवंतराव चव्हाणांची स्वाभीमानी वृत्ती तसेच खंबीरता स्पष्ट होते.

सीमावादाचे गांभीर्य लक्षात घेवुन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांनी सभागृहात निवेदन केले की, कर्नाटकाच्या वतीने सीमाप्रश्न सोडविण्यासाठी सकारात्मक, निर्णायक धोरण नसल्यामुळे सीमाप्रश्नाविषयी निर्णय केव्हा अथवा कधी होईल याविषयी स्पष्ट सांगणे कठिण असले तरी सीमावाद हा सुटावा यासाठी

माझी तळमळ असल्याचे स्पष्ट करतात. तसेच सीमावादाचा हा भविष्यातील इतिहासावर आधारीत ठेवुन इतिहास देखील कर्तृत्ववान कणखर नेतृत्व माणसे घडवित असल्याने सीमावादाविषयी सतत कार्यरत असावे असे करावे ते नमुद करतात.

दोन्ही राज्यातील वाढते तणावाचे राजकीय सामाजिक क्षेत्रातील संबंध लक्षात घेवुन केंद्रसरकारच्या वतीने एका मिडिएनशन कमिटीची नियुक्ती केली गेली. मद्रास केरळचा सीमाप्रश्न सोडविणा-या पाटसकर निवाड्याचे प्रमुख श्री पाटसकर यांचे नाव महाराष्ट्राकडुन सुचविले गेले. ते राज्यपाल असताना देखील केंद्रसरकारच्या समंतीने त्यांनी सहमती दिली. या मिडीएशनकमिटीने विभागीय मंडळासमोर अहवाल सादर करावा असे ठरले होते. परंतु कर्नाटकच्या वतीने गौण मुद्यासंबंधी चर्चाविषयी निर्णय घेतल्याने निर्णयप्रत जाणे आता अशक्य असल्याचे लक्षात आल्याने अशा गौण मुद्यांच्या चर्चेला महाराष्ट्राची सहमती नसल्याचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांनी सभागृहात स्पष्ट केले.

मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण हे सभागृहात निवेदन करतात की सर्वमान्य ह्या तत्वानुसार सीमावाद हा सोडविला जावा ही महाराष्ट्राची मागणी आहे. महाराष्ट्र-कर्नाटक राज्याच्या सीमा ह्या भाषा तत्वाच्या आधारे निश्चित केल्या गेल्याने सीमावर्ती भागाची पुर्नरचना करताना भाषीक तत्व लक्षात घेतले पाहीजे. भाषिक अल्पसंख्याकांची समस्या ही साधारण दर्जाची मानण्यात यावी. सीमावाद सोडविताना जिल्हा, तालुके असा आधार निश्चित मानता येणार नाही. खेडेदेखील ग्राह्यधरुन त्या भागात बोलीभाषाची सख्या, अंदाज घेवुन त्या भाषाला अनुसरून सीमा निश्चित केल्या जाव्यात परंतु तांत्रीक स्थितीमुळे अडचण येत असेल तर तशी परिवर्तनाची मान्यता असावी. अशा या तत्वास मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण सभागृहात पाठिंब्याची मागणी करताता.

सीमावाद सोडविताना कानडी भाषिकांच्या भावनाना ठेच पोहचणार नाही याबद्दल देखील मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण काळजी घेतात. यावरुन सीमावादावरून कर्नाटक सरकारकडुन प्रतिसाद हा सकारात्मक मिळत नसताना देखील ते कानडी बांधवाचा आदर करतात म्हणजेच ते ऐक संस्कृत राजकारणी व शांतचित्त होते हे मात्र खरे. सीमाप्रश्न हा दोन राज्यादरम्यानच्या काही विभागातील असुन न्याय संबंधीचा हा प्रश्न असल्याने विनासंघर्ष हा सीमावाद सुटावा ही तळमळीची भावना यशवंतराव चव्हाणांची होती हे मात्र निश्चितच.

सीमाप्रश्नाविषयी यशवंतराव चव्हाणांनी दि. ११ मार्च सन १९६० ला सभागृहात निवेदन केले व यासंबधी ठराव देखील मांडला सन १९५५ ला राज्यपुर्नरचना मंडळाचा अहवाल प्रसिद्ध झाल्यापासून सीमावाद हा महत्वाचा प्रश्न बनला आहे. या सीमावादाविषयी लोकसभा, राज्यसभेत चर्चा घडवुन आणली परंतु प्रश्न सुटला नाही. महाराष्ट्र-कर्नाटक राज्यासाठी जे विभागीय मंडळ निर्माण केले गेले आहे ह्याच्या साह्याने सीमाप्रश्न सोडवावा असे ठरले. विभागीय मंडळापुढे महाराष्ट्राच्या वतीने स्पष्ट केले

की, सीमावाद हा सर्वमान्यतत्वाच्या आधारे सोडवावा परंतु सीमावाद हा विभागीय मंडळाकडुन सुटू शकला नाही.

दिनांक १३ जुलै सन १९६० ला मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांनी विधानसभेत स्पष्ट केले की सीमावादाविषयी मराठी जनांच्या भावना ह्या तीव्र आहेत, हा सीमावाद ठरावाच्या साह्याने केंद्राकडे मांडला असुन अपेक्षित निर्णय येण्याची शक्यता ते नाकारतात. वास्तविक परिस्थीतीला सामोरे जाण्याचा सल्ला देखील देतात. मात्र राजीनामे देण्यास ते नकार देतात कारण जनतेचे इतर प्रश्नाकडे दुर्लक्ष केले जाऊ शकत नाही हे देखील स्पष्ट करतात.

सीमावादामुळे दोन्ही राज्यातील जनमत हे परस्पर विरोधी बनले आहे. ही परिस्थिती बदलली पाहीजे असे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांना वाटत असे कारण सीमावाद सोडविण्यासाठी सकारात्मक निर्णय वातावरणाची आवश्यकता ही त्याची भावना होती. या सीमावादाविषयी महाराष्ट्र शासनाने घेतलेली भूमिका व कार्याचे ते समर्थन करतात या सीमावादातुन राजकीय राजीनामे, जनता-सरकार सहकार्यातुन आंदोलने केल्याने ह्या प्रश्नाचा गुंता वाढुन त्यास राजकीय स्वरूप प्राप्त होईल हे देखील स्पष्ट करतात.

**आजची सीमावादाची स्थिती**

मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण हे संयमी, उच्चविचारशक्ती, लोकशाही यंत्रणेला प्राधान्यता देणारे व्यक्तीमत्व असल्याने सीमावाद हा राजकीय पातळीवरून सोडविण्ासाठी विविध मार्गाव्दारे ते प्रयत्नशील होते. त्यांनी कानडीच्या भावनेचा आदर केल्याने सीमावाद प्रश्न हा एक विशीष्ट पातळीवर कार्यरत होता.

सध्या परिस्थिती हा महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद हा अत्यंत चिघळलेला असुन महाराष्ट्र-कर्नाटक राज्यातील राजकीय नेतृत्व, सीमावर्ती भागातील जनता तर संवेदनशील बनली आहे परंतु राज्यातंर्गत ज्या दळणवळणाच्या सुविधा आहेत ह्या देखील आंदोलकाच्या झळीमुळे क्षतीग्रस्त बनत आहेत ही चिंतेची बाब होय.

सन १९६९ पासुन महाराष्ट्र एकीकरण समिती लढा देत आहे. यातुन मराठी भाषिकांवर कर्नाटक सरकारकडुन अन्याय केला जात आहे. यातुनच महाराष्ट्र शासनाच्या वतीने सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली गेली. मराठी व्देषातुन बेळगाव महापालीका बरखातीचा निर्णय हा कर्नाटक कडुन घेण्यात आला. तसेच केंद्रसरकारच्या वतीने याचिका दाखल केली गेली की, सीमाप्रश्न भाषा हा आधार नसल्याचा दावा दाखल केला गेला यातुन महाराष्ट्राचे राजकारण ढवळुन निघाले आणि महाराष्ट्र शासनाच्या वतीने सुप्रीम कोर्टात हा केंद्र शासीत प्रदेश जाहीर करावा म्हणुन याचिका दाखल केली गेली. म्हणजेच महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादाचा गुंतागुंत हा वाढतच आहे. आणि आजच्या महाराष्ट्र शासनाची

कर्नाटक सीमावादा विषयीचो भूमिका कणखर नसून सीमावर्ती मराठी भाषिकांवर अन्याय करणारी आहे. हे मात्र स्पष्ट होते.

**सारांश**

मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांनी सीमाप्रश्नी जी भूमीका घेतली होती ती संयमी, जिद्दीची, चिकाटीची आणि या त्यांच्या भूमिकेबद्दल सातत्याने सभागृहात चर्चा करत, ठराव मांडत आणि हे सर्व खेळीमेळीच्या वातावरणात होत असे. मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांनी आंदोलन, राजकीय हस्तक्षेप चळवळीतुन सहभाग यास केलेला विरोध हा योग्य होता. परतु आज हा हस्तक्षेप राजकीय क्षेत्रातुन रस्त्यावर आल्याने सीमावाद प्रश्न हा चिघळला आहे आणि आता हा वाद सुप्रीम कोर्टात पोहचला आहे. हा वाद संपुष्टात आणण्यासाठी आजही यशवंतराव चव्हाणांची नीती, विचारधारा, संयमपणा ह्याची आवश्यकता राजकीय नेतृत्वाकडे असणे आवश्यक आहे. तसेच ती काळाची गरज आहे.

**संदर्भ**


१. डॉ. नरेंद्र दाभोळकर - साधना, अंक ३१

२. डॉ. विजय पाथ्रीकर - थोरले साहेब, साकेत प्रकाशन, औरंगाबाद

३. केशव बा. वसेकर, सह्याद्रीचे वारे - ऐक अभ्यास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद

४. संपादक प्रा. अशोक नाईकवाडे, आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण, प्रकाशक प्राचार्य, देवगिरी कॉलेज, औरंगाबाद

५. राम प्रधान, वाटचाल यशवतरावांचे समवेत (व्दिभाषिक महाराष्ट्र राज्य मुख्यमंत्रीपदाचा काळ), अमेय इन्सपायरिग बुक्स, पुणे


❑ ❑ ❑



Assistant Professor
JBSPM's ... & Sci. College,
Gadhi Tq. Georai Dist. Beed